ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्य काळातील प्राथमिक शिक्षणाचे स्वरूप ः

**Komal Balasaheb Mhetre**
**Guidence – Prof. Dr. Chandan Shinagte**

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना** ः प्राथमिक शिक्षणात बालकाची मुलभूत आवश्यकता समजण्यात येते. प्राथमिक शिक्षण सर्वाना मिळाले पाहिजे ते ही मोफत सार्वत्रिक व सक्तीचे असले पाहिजे भारतीय राज्यघटनेत कलम ४५ अन्वये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक मोफत व सक्तीचे करावे असे सूचित केले आहे त्यात पुढीलप्रमाणे आशावाद व्यक्त करण्यात आला आहे.
संकल्पना ः राज्य घटनेचा स्वीकार केल्यापासून दहा वर्षाच्या आत सर्व बालकाना त्याचे वय १४ वर्षे पुर्ण होईपर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यास राज्यशासन प्रयत्नशील असेल.
भरतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० मध्ये आस्तित्वात आली त्या वेळेपासून १९६० शक्यतो प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे व्हावे असा त्याचा अर्थ होतो.
**भारतातील प्राथमिक शिक्षण हे सार्वत्रिक मोफत व सक्तीचे असावे अशी संकल्पना आहे.**
शिक्षण व्यक्तीचा मुलभूत हक्क असतो. तो हक्क प्राप्त करून देण्याचे साधन म्हणजे सार्वत्रिक शिक्षण समजण्यात येते याचा अर्थ असा की जात धर्म पंथ लिंग किंवा शारिरीक व्यंगाशिवाय भेदभाव न करता सर्वांना शिक्षण देण्यात येतो. समाजात शासन किवा सरकार आणि लोक किंवा जनता असे दोन घटक असल्याने त्या दोन्ही घटकास सक्ती हा शब्द लागू पडतो. शासनाने सहा ते चौदा या वयोगटातील बालकांना शिक्षण देणे हे त्याचे कर्तव्य आहे आणि पालकांनी आपल्या पाल्यांना याच वयोगटात मोडर्णाया शाळेत हमखाास पाठवावे. असा नियम केलेला आहे. यावरून असा प्रत्ययास येतो की सहा ते चौदा या वयोगटात मोडर्णाया मुलांना मोफत शिक्षण देण्याची शासनाची जबाबदारी असते आणि अशा सुविधाचा फायदा घेण्याची सक्ती जनतेवर असते.
**प्राथमिक शिक्षणाचे महत्व** ः भारतीय राज्यघटनेत कलम ४५ नुसार मुलांना प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक मोफत व सक्तीचे करून वयोगट ६ ते १४ या दरम्यान असर्णाया बालकांना ते देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणास सामाजिक महत्व प्राप्त झाले.
**प्राथमिक शिक्षण व्यक्तिगत दृष्टीने सुध्दा महत्वाचे मानले जाते.** ः प्राथमिक शिक्षणामध्ये ३ आर ला महत्वाचे स्थान असते ते ३ आर म्हणजे वाचन लेखन व अरिथमॅटिक गणित ही प्राथमिक शिक्षणात ही महत्वाचे साधने म्हणून ज्ञानसंपादनासाठी वापरण्यात येतात.

**भविष्य काळातील प्राथमिक शिक्षण ः**

प्राथमिक शिक्षण हा उच्च शिक्षणाचा पाया आहे. त्यामुळे भक्कम असणे आवश्यक आहे. भविष्यकाळात हा पाया म्हणजेच प्राथमिक शिक्षण हे नाविन्य पुर्ण व गुणवत्ता पुर्ण होण्यासाठी प्राथमिक शिक्षणामध्ये विविध अध्यापन अध्ययन पध्दतीचा अवलंब करून प्राथमिक शिक्षणात बदल करून नविन पध्दतीने शिक्षण दिले जाऊ शकते
भविष्य काळातील विद्यार्थी हे हुशार व कियाशील असल्यामुळे प्राथमिक शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ शकतो. उदा. Computer Tecnology and mobile apps दवारे प्राथमिक शिक्षणामध्ये game base trening चा वापर करू शकतो तसेच puzzle matching the picture असा गोष्टीचा वापर हा अध्यापन अध्ययन पध्दतीमध्ये समावेश केला जाऊ शकतो आणि त्या पध्दतीदवारे शिकले जाऊ शकते. प्राथमिक शिक्षण घेत असताना विद्यार्थी हा चंचल व बुध्दीमान असल्याने नवीन तंत्रावर पध्दतीचा वापर हा जलद गतीने आत्मसात करू शकतो.

भविष्यकाळात शिक्षणाबरोबरच त्याची मानसिक व शारिरीक शक्ती व्यवस्थित राहण्यासाठी त्याच्याबरोबर आंतरकिया ही सकारात्मक ठेऊन शिक्षण दिले जाऊ शकते तसेच त्याचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी विद्यार्थ्यासोबत वातावरण हे आनंदी व हसत खेळत असावे त्याच्यामुळे विद्यार्थ्याच्या मनावर ताण येणार नाही .

प्राथमिक शिक्षणामध्ये विध्यार्थ्याना कविता बडबडगीते कथा छान छान गोष्टी आवडत असतात त्यामुळे भविष्य काळात तंत्रज्ञानादवारे विद्यार्थ्याना Audio दवारे गोष्टी शिकविल्या जाऊ शकतात तसेच Audio visual aids दवारे कविताची video दाखवून कविता शिकवल्या जाऊ शकतात .या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थ्याचे अवधान लक्ष केंद्रित होऊ शकते . व अध्ययनात रूची वाढू शकते .

तसेच वर्ग नियत्रंन सुध्दा होऊ शकतो .

भविष्यकाळात प्राथमिक शिक्षण हे कियाशील व सर्व गुणसंपन्न व्हावे यासाठी भविष्यकाळातील शिक्षणाचे स्वरूप यामध्ये बदल व्हावेत .

समारोप ः भविष्य काळातील प्राथमिक शिक्षणामध्ये बदल घडवून आणले तर किंवा अध्यापन अध्ययन पध्दतीत बदल केला तर विद्यार्थ्याची संख्या ही शिक्षण क्षेत्रात वाढली जाईल आणि प्राथमिक शिक्षण पाया हा भक्कम होईल तसेच शिक्षणा पासून दूर असर्णाया विद्यार्थ्याना शिक्षण घेण्याची संधी मिळतील . तसेच प्राथमिक शिक्षणात निम्म होर्णाया समस्यांवर मात करता येई ल .

संदर्भ ः

*शिक्षकाचे शिक्षण ः लेखक ः डॉ . के .यु . धोरमोडे*
*डॉ . कला धोरमोडे*
*प्रकाशन ः विद्या प्रकाशन. नागपुर*
*https://www.google.co.in*